# प्रसिद्धी विभाग

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

## २०१२– २०१३

सकाळ पुणे जिल्हा रविवार, ३ फेब्रुवारी २०१३ ५



राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या कै. साहेबराव बुट्टे पाटील व्याख्यानमालेमध्ये महाविद्यालयीन युवकांशी संवाद साधताना विधानसभेचे अध्यक्ष दिलीप वळसे पाटील.

# युवकांनी मतदानप्रक्रियेत भाग घ्यावा : वळसे पाटील

राजगुरुनगर, ता. २ : 'सध्या शासन, प्रशासन व्यवस्थेविरोधात नकारात्मक भावना तयार होत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी युवकांनी मतदानप्रक्रियेत भाग घेऊन सकारात्मक प्रतिसाद दिल्यास देशाची निश्चितच प्रगती होईल,' अशी आशा विधानसभेचे अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी राजगुरुनगर (ता. खेड) येथे व्यक्त केली.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या स्व. साहेबराव बुट्टे पाटील व्याख्यानमालेमध्ये शेवटचे पुष्प गुंफताना वळसे पाटील 'एक संवाद युवकांशी' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, मानद सचिव ॲड. राम कांडगे, माजी आमदार ॲड. सूर्यकांत पलांडे उपस्थित होते.

वळसे पाटील म्हणाले, "महाविद्यालयीन युवकांनी मोठी स्वप्ने पाहून ती कृतीत आणण्याचा प्रयत्न करावा. मी ग्रामीण भागातील आहे हा न्यूनगंड मनातून काढून टाका. अपयश आले तरी खचून न जाता पुन्हा प्रयत्न करावा." व्याख्यानमालेमध्ये डॉ. विजया वाड, मकरंद टिल्लू, राहुल सोलापूरकर, ॲड. अपर्णा रामतीर्थकर, अभिनेते विक्रम गोखले, माजी खासदार श्रीनिवास पाटील यांचीही व्याख्याने झाली. व्याख्यानमाला प्रमुख प्रा. ए. व्ही. कुलकर्णी यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख